## प्रकरण पाचवे

### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था कर्ज पुरवठयाव्यतिरिक्त करीत असलेली इतर कार्ये

## प्रकरण पाचवे

### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था कर्ज पुरवठ्याव्यतिरिक्त करीत असलेली इतर कार्ये

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची स्थापना १९४६ साली झालेली आहे. कार्यक्षेत्रातील सभासदांना ही संस्था कर्ज पुरवठ्याचे कार्य करीत आहे. त्याच बरोबर कार्यक्षेत्रातील सभासदांच्या व बिगर सभासदांच्या इतरही गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने संस्थेने अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यामुळे त्यांचा फायदा संस्थेच्या सभासदांना, बिगर सभासदांना व आजूबाजूच्या परिसरातील व्यक्तींनाही झालेला आहे. उदा. संस्थेने रेशन धान्य दुकाना बरोबरच बिगर रेशन धान्य दुकान सुरू केलेले आहे. या दुकानातून लोकांना योग्य किंमतीस, दर्जेदार व भेसळविरहीत जीवनावश्यक वस्तू मिळतात. त्यामुळे त्यांची आर्थिक बचत होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत झालेली आहे. या संस्थेमार्फत जे उपक्रम राबविले जातात त्यांचा नफा मिळविणे हा एकमेव उद्देश नाही तर समाजातील व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करता याव्यात व त्यांच्या कल्याणात भर पडावी हा उद्देश आहे.

संस्थेने सुरू केलेल्या अनेक उपक्रमांमुळे सभासदांच्या आणि इतरांच्या आर्थिक कल्याणामध्ये भर घातलेली आहे. संस्था करीत असलेल्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

१) सूत विभाग :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने संस्थेच्या स्थापनेपासून हा उपक्रम सुरू केलेला आहे. कदमवाडी हा परिसर कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आहे व

तक्ता क्र. ५.१

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या शत खरेदी विक्री व्यवहातील वाढ

| वर्ष | आरंभीची शिल्लक (रुपयात) | शत खरेदी (रुपयात) | हमाली (रुपयात | शत विक्री (रुपयात) | शत कमिशन (रुपयात) | अखेर शिल्लक (रुपयात) | व्यापारी नफा (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | ९४०-५० (१००.००) | २,९६,७९८-४६ (५८.६७) | ४२९-८५ (-४३.५१) | २,९५,६५२-७५- (५७.८९) | १,०६८-५० (५३.५२) | ३,०५०-०० (३००.७९) | १,६८२-४४ (२९,६९) |
| १९८१-८२ | ३,०५०-०० (२२४.४७) | २,२५,६४५-५० (४.१२) | ३८१-९० (-११.१५) | २,२३,९९३-५० (३.८७) | १,०११-५० (-५.३३) | ७,२३३-७५ (१३७.१७) | ३,१६१-३५ (८७.१०) |
| १९८२-८३ | ७,२३३-७५ (१३७.१७) | २,५५,६०९-२२ (१३.२८) | ४८३-२५ (२०.१७) | २,४९,२२५-०० (११.२६) | १,५९०-०० (५७.११) | १७,३५६-३३ (१३९.९४) | ४,८४५-११ (५३.२६) |
| १९८३-८४ | १७,५३६-३३ (१४२.४२) | २,२४,०४९-३० (-१२.३५) | ५१७-२५ (७.०३) | २,३५,४६०-०० (-५.५२) | १,१४६-०० (-२७.९२) | १०,३७६-७० (-४०.२१) | ५,०५१-८२ (४.४३) |
| १९८४-८५ | १०,३७६-७० (-४०.८३) | २,५७,७७७-७० (१५.०५) | ६४१-८० (२४.०८) | २,६८,०७१-०० (१३.८५) | १,२६३-५० (१०.२५) | ४,२५३-०० (-५९.०१) | ४,७९१-३० (-५.३१) |
| १९८५-८६ | ४,२५३-०० (-५९.०२) | २,८२,१५५-३१ (९.४७) | ८५७-०० (३३.५३) | २,८१,४८४-०० (५.००) | १,४११-१६ (१२.३२) | १५,६८०-५० (२६८.६९) | ११,३९८-३५ (१३६.२३) |
| १९८६-८७ | १५,६८०-५० (२६८.६९) | २,४१,३९६-५० (-१४.४५) | ५६१-०० (-३३.६१) | २,५८,६२८-०० (-८.११) | १,२७५-०० (-१०.१६) | ५,९४८-०५ (-६२.०७) | ५,५२५-०५ (-५१.११) |
| १९८७-८८ | ५,९४८-०५ (-६२.०७) | २,२८,९६४-७५ (-५.४७) | ४७४-०० (-१६.७०) | २,३६,३७०-०० (-८.६१) | १,१३४-७५ (-११.००) | ३,०३६-४० (-४८.९५) | ५,९३४-३५ (७.४१) |
| १९८८-८९ | ३,०३६-४० (-४८.९५) | ३,०३,४३७-१० (३२.९८) | ६१७-२० (३०.२१) | ३,००,६४६-०० (२७.१९) | १,४९३-८० (३१.६४) | ११,७३१-९० (२८६.३८) | ६,७८१-०० (१४.२७) |
| १९८९-९० | ११,७३१-९० (२८६.३८) | ३,५६,५५५-१७ (१७.५१) | ७२४-५० (१४.८१) | ३,७५,३८६-०० (२४.८६) | १,५९८-२७ (६.९१) | १,३९६-२५ (-८८.१०) | ९,३६८-९५ (३८.१६) |
| १९९०-९१ | १,३९६-२५ (-८८.१०) | ३,४१,७३०-१५ (-२.११) | ६५२-५० (-९.९४) | ३,५६,७३०-०० (-४.९६) | १,४६३-५५ (-८.४३) | ४७६-२५ (-६५.८९) | ६,८२०-९० (२६.४५) |
| सरासरी वृध्दी दर | ७८.२१ | ७.९० | १.४७ | १०.६१ | ९.९२ | ६९.८८ | ३१.०२ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

(टीप : कंसातील आकडे संबंधित घटकाचे वार्षिक वृध्दी दर दर्शवितात)

आलेख क्र. ५.१.

“संस्थेच्या खत खरेदी-विक्री व्यवहारातील व्यापारी नफा दर्शविणारा आलेख”

प्रमाण :-

१ सें. मी. = १००० रु. व्यापारी नफा



येथे पावसाचे प्रमाण चांगले आहे. तसेच जवळच पंचगंगा नदी असल्यामुळे शेत जमिनीचे क्षेत्र बागाईत आहे. येथील शेतक-यांचे मुख्य पीक ऊस हे आहे. ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी ऊसासाठी आधुनिक रासायनिक खतांचा अवलंब करणे हे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून संस्था सभासद शेतक-यांना योग्य किंमतीस, दर्जेदार खते उपलब्ध करून देते. संस्थेच्या खत विभागामार्फत शेतक-यांना प्रामुख्याने कृषी उद्योग, युरिया, सुपरफॉस्फेट, पोटॅश, संपूर्ण मिश्र खत, इफको मिश्र खत, बैल छाप मिश्र खत, डाय अमोनियम फॉस्फेट, तृणनाशके व जंतुनाशके उपलब्ध करून दिलेली आहेत. संस्थेने हा खत विभाग सुरू केल्यामुळे शेतक-यांना योग्य दराने योग्य वेळी खत उपलब्ध होते. त्यामुळे त्यांची आर्थिक बचत होण्यास मदत झालेली आहे. कारण खाजगी व्यापा-यांकडून खत खरेदी करण्याऐवजी संस्थेच्या खत विभागातून खत खरेदी केल्यामुळे त्यांची आर्थिक बचत होते.

संस्था सभासदांना ऊस पीक कर्ज देते. ते काही अंशी वस्तूंच्या स्वरूपात व काही अंशी रोख पैशाच्या स्वरूपात देते. सभासदांना त्यांच्या मंजूर कर्ज रकमेतून खत उपलब्ध करून देण्याची सोय संस्थेने केलेली आहे. त्यामुळे संस्थेच्या ऊस पीक कर्जाचा कर्ज देण्याचा हेतू साध्य होण्यास मदत झाली आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खत खरेदी व विक्री व्यवहारातील वाढ तक्ता क्र. ५.१ मध्ये दर्शविला आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खत विक्रीच्या वार्षिक वृध्दीदरामध्ये चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी खत विक्रीचा वार्षिक दर जास्त आहे. तर काही वर्षी खत विक्रीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. १९८३-८४, १९८६-८७, १९८७-८८ व १९९०-९१ मध्ये संस्थेच्या खत विक्रीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. कारण त्या वर्षी सभासदांनी खताची मागणी कमी केलेली आहे.

सभासदांनी संस्थेकडून खत कमी खरेदी केलेले आहे व ज्या वर्षी खताच्या विक्रीचा वार्षिक वृध्दी दर वाढलेला आहे त्यावर्षी सभासदांनी संस्थेकडून जादा खत खरेदी केलेले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेचा खत विक्रीचा सरासरी वार्षिक दर १०.६१ टक्के आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने खत विक्री केल्यामुळे संस्थेला रु.१४,४६४-०३ इतके खत कमिशन मिळाले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील खत विभागाचा खत कमिशन सरासर वृध्दी दर ९.९२ टक्के आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खत विभागाच्या व्यापारी नफ्याचा सरासरी वृध्दी दर ३१.०२ टक्के आहे (तक्ता क्र.५.१) १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये खत विभागास एकूण रु. ६५,३५८.६२ इतका व्यापारी नफा झालेला आहे. १९८४-८५ हे वर्ष वगळता खत विभागाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. १९८५-८६ वर्षी खत विभागाच्या व्यापारी नफ्यामध्ये सर्वात जास्त वाढ झालेली आहे. म्हणजेच ही वाढ १३६.२३ टक्के आहे.

खत विभागास जो नफा होतो तो संस्थेच्या नफ्याकडे वर्ग केला जातो. १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये खत विभागास प्रत्येक वर्षी नफा झालेला आहे. वर्ष अखेर खरेदी केलेल्या खतांची विक्री होते. वर्ष अखेर शिल्लक माल मोठया प्रमाणावर राहत नाही. त्यामुळे संस्थेचे भांडवल त्यामध्ये अडकून पडत नाही. हे या विभागाच्या व संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने योग्यच आहे. शासनाने जून १९८० पासून केलेल्या खत दरवाढीमुळे खत विभागाच्या नफ्यामध्ये वाढ झाली आहे.(तक्ता क्र. ५.१)

२) धान्य विभाग (रेशन व बिगर रेशन) :

भारताने कल्याणकारी राज्यांची भूमिका स्विकारली आहे.त्यामुळे सरकारतर्फे नागरिकांना योग्य दरामध्ये साखर, तेल, गहू, ज्वारी, तांदुळ इ. जीवनावश्यक धान्ये यांची विक्री केली आहे. सरकारने ही धान्ये वितरीत करण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांना परवानगी दिली

तक्ता क्र. ५.२

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या धान्य विभागाच्या (रेशन व बिगर रेशन) व्यवहारातील वाढ

| वर्ष | आरंभीची शिल्लक (रुपयात) | खरेदी (रुपयात) | विक्री (रुपयात) | व्यापारी नफा (रुपयात) | अखेर शिल्लक (रुपयात) | निव्वळ नफा (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | १०,४२८-५५<br>(२६.७५) | ४,३९,६६८-२६<br>(५७.४०) | ४,५३,४१७-४०<br>(६१.०६) | १४,३७०-१५<br>(१२९.४४) | ११,०४९-५६<br>(५.९५) | ६,१४२-०१<br>(-४१.१०) |
| १९८१-८२ | ११,०४९-४८<br>(५.९५) | ५,७८,२०१-३५<br>(३१.५१) | ५,९१,९५८-०२<br>(३०.५५) | १७,९१५-००<br>(२४.६७) | १५,२०७-८१<br>(३७.६३) | ८,९२०-५८<br>(४५.२३) |
| १९८२-८३ | १५,२०७-८१<br>(३७.६३) | ४,८९,३९९-३८<br>(-१५.३६) | ५,१२,०३६-११<br>(-१३.५०) | १७,५७०-३४<br>(-१.९२) | १०,१४१-५०<br>(-३३.३१) | ४,००९-५२<br>(-५५.०५) |
| १९८३-८४ | १०,१४१-५०<br>(-३३.३१) | ५,७२,७५७-७०<br>(१७.०३) | ५,८९,६००-००<br>(१५.१५) | २०,२७७-३४<br>(१५.४१) | १३,५७६-५४<br>(३३.८७) | ५,२१०-५७<br>(२९.९५) |
| १९८४-८५ | १३,५७६-५४<br>(३३.८७) | ५,०६,७११-९८<br>(-११.५३) | ५,२५,४७३-८५<br>(१०.८८) | १६,९८३-२५<br>(-१६.२५) | ११,७९७-९२<br>(-१३.१०) | ३,३८६-८८<br>(-३५.००) |
| १९८५-८६ | ११,७९७-९२<br>(१३.१०) | ८,०४,३०७-३८<br>(५८.७३) | ८,३५,६३६-९९<br>(५९.०२) | ३२,०५३-९८<br>(८८.७४) | १२,५२२-२५<br>(६.१४) | ११,६६९-२१<br>(२४४.५४) |
| १९८६-८७ | १२,५२२-२५<br>(६.१४) | ८,१२,०५४-४३<br>(१.९२) | ८,४०,४३५-६३<br>(०.५७) | २२,३१४-४६<br>(-३०.३८) | ६,४५५-५१<br>(-४८.४४) | ४६२-२८<br>(-९६.०४) |
| १९८७-८८ | ६,४५५-५१<br>(-४८.४४) | ११,११,८८७-६१<br>(३७.११) | ११,४३,८३८-११<br>(३६.१०) | २७,८७३-०६<br>(२४.९१) | १०,३७८-०७<br>(६०.७६) | ६,८२७-७६<br>(१३७६.९७) |
| १९८८-८९ | १०,३७८-०७<br>(६०.७६) | ९,७३,६६२-९१<br>(-१३.०६) | १०,०२,११७-०५<br>(-१२.३१) | ३५,८३२-५९<br>(२८.७०) | १६,८७६-५२<br>(६२.६१) | ८,७६४-५४<br>(२८.३७) |
| १९८९-९० | १६,८७६-५२<br>(६२.६२) | १०,५५,१२८-०८<br>(८.३७) | ११,०४,५१६-११<br>(१०.१२) | ४७,५६८-५२<br>(३२.७५) | १५,०५७-०१<br>(-१०.७८) | १९,५८४-०४<br>(१२३.४५) |
| १९९०-९१ | १५,०५७-०१<br>(-१०.७८) | ११,६५,१०२-५१<br>(१०.४२) | १२,१४,१३९-२२<br>(९.९२) | ५१,२७३-४०<br>(७.७९) | १७,२९३-७०<br>(१४.८५) | २२,७५५-५२<br>(१६.१९) |
| सरासरी वृध्दी दर | ११.६४ | १६.६७ | १६.८७ | २७.६२ | १०.५६ | १४८.८६ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

(टीप : कंसातील आकडे संबंधित घटकाचे वार्षिक वृध्दी दर दर्शवितात).

# आलेख क्र. ५.२

## “ १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या धान्य विभागाच्या व्यापारी नफा व निव्वळ नफा यांची तुलना दर्शविणारा आलेख ”

**प्रमाण :-**

१ सें.मी. = रु.५,००० व्यापारी व निव्वळ नफा



आहे. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९६२-६३ पासून रेशन धान्य विभाग सुरू केलेला आहे. तसेच या विभागा बरोबरच बिगर रेशन धान्य दुकान हाही विभाग सुरू केलेला आहे. या विभागामार्फत सभासद व बिगर सभासदांना साबण, खाद्य तेल, ज्वारी, सर्वप्रकारच्या डाळी इ. वस्तूंचे योग्य किंमतीस वितरण केले जाते. या विभागामुळे सभासद व बिगर सभासदांना सरकारी स्वस्त दरातील वस्तू व इतर वस्तुमाल योग्य दरामध्ये वेळेवर मिळू लागला. खाजगी व्यक्तीकडे अशी जबाबदारी असती तर त्यामुळे अनेक गैरसोयी व गैरप्रकार निर्माण झाले असते. संस्थेने स्वस्त धान्य दुका चालविल्यामुळे संस्थेला कमिशन मिळू लागले व त्यामुळे संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास मदत झाली. तसेच या विभागामार्फत लोकांना रॉकेल तेलाचे योग्य दराने वाटप केले जाते.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या धान्य विभागाच्या व्यवहारातील वाढ तक्ता क्र. ५.२ मध्ये दर्शविली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरामवर्षामध्ये संस्थेच्या धान्य विभागाचा धान्य खरेदीचा सरासरी वृध्दी दर ११.६४ टक्के आहे. तर धान्य विक्रीचा सरासरी वृध्दी दर १६.८७ टक्के आहे. म्हणजेच ही बाब संस्थेच्या दृष्टीने महत्वाची आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेच्या धान्य विभागास रु. ३,०४,०३२-०९ इतका व्यापारी नफा झालेला आहे तर निव्वळ नफा रु. ८७,७३२-९१ इतका झालेला आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील धान्य विभागाचा व्यापारी नफ्याचा सरासरी वृध्दी दर २७.६२ टक्के आहे. तर निव्वळ नफ्याचा सरासरी वृध्दी दर १४८.८६ टक्के आहे. १९८७-८८ या वर्षी संस्थेच्या निव्वळ नफ्याचा वार्षिक वृध्दी दर सर्वात

तक्ता क्र. ५ ३

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील नफा विभागणी
(धान्य विभाग)

| वर्ष | मुख्य कार्यालयाकडे वर्ग (४० टक्के) (रूपयात) | वाटप व्यवहार गंगाजळी (२५ टक्के) (रूपयात) | विशेष विकास निधी (३५ टक्के) (रूपयात) | एकूण निव्वळ नफा (रूपयात) |
|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,४५६-८१<br>(२५.१७) | १,५३५-५० | २,१४९-७० (२५.१७) | ६,१४२-०१ (२५.१७) |
| १९८१-८२ | ३,५६८-२३<br>(४५.२४) | २,२३०-१४<br>(४५.२४) | ३,१२२-२१<br>(४५.२४) | ८,९२०-५८<br>(४५.२४) |
| १९८२-८३ | १,६०३-८०<br>(-५५.०५) | १,००२-३८<br>(-५५.०५) | १,४०३-३४<br>(-५५.०५) | ४,००९-५२<br>(-५५.०५) |
| १९८३-८४ | २,०८४-२३<br>(२९.९६) | १,३०२-६४<br>(२९.९५) | १,८२३-७०<br>(२९.९५) | ५,२१०-५७<br>(२९.९५) |
| १९८४-८५ | १,३५४-७५<br>(-३५.००) | ८४६-७२<br>(-३५.००) | १,१८५-४१<br>(-३५.००) | ३,३८६-८८<br>(-३५.००) |
| १९८५-८६ | ४,६६७-६०<br>(२४४.५४) | २,९१७-३०<br>(२४४.५४) | ४,०८४-३१<br>(२४४.५४) | ११,६६९-२१<br>(२४४.५४) |
| १९८६-८७ | १८४-९१<br>(-९६.०४) | ११५-५७<br>(-९६.०४) | १६१-८०<br>(-९६.०४) | ४६२-२८<br>(-९६.०४) |
| १९८७-८८ | २,७३१-१०<br>(१३७६.९९) | १,७०६-९४<br>(१३७६.९९) | २,३८९-७२<br>(१३७६.९९) | ६,८२७-७६<br>(१३७६.९९) |
| १९८८-८९, | ३,५०५-८२<br>(२८.३७) | २,१९१-१३<br>(२८.३७) | ३,०६७-५९<br>(२८८.३७) | ८,७६४-५४<br>(२८.३७) |
| १९८९-९० | ७,८३३-६२<br>(१२३.४५) | ४,८९६-०१<br>(१२३.४५) | ६,८५४-४१<br>(१२३.४५) | १९,५८४-०४<br>(१२३.४५) |
| १९९०-९१ | ९,१०२-२१<br>(१६.११) | ५,६८८-८८<br>(१६.११) | ७,९६४-४३<br>(१६.११) | २२,७५५-५२<br>(१६.११) |
| सरासरी वृध्दी दर | १५४.८९ | १५४.८९ | १५४.८९ | १५४.८९ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

(टीप : कंसातील आकडे संबंधित घटकांचे वार्षिक वृध्दी दर दर्शवितात)

## विभाजीत वर्तुळ क्र ५.१

### "१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील नफा विभागणी

### (धान्य विभाग)



जास्त म्हणजे १३७६.९७ टक्के आहे व सर्वात कमी वार्षिक वृध्दी दर १९८६-८७ मध्ये (-९६.०४ टक्के) आहे. (तक्ता क्र. ५.२)

संस्थेच्या धान्य विभागास जो निव्वळ नफा होतो त्याचे वर्गिकरण तीन प्रकारे केले जाते. हे वर्गिकरण तक्ता क्र. ५.३ मध्ये दर्शविले आहे.

१) एकूण निव्वळ नफ्याचा ४० टक्के भाग संस्थेकडे वर्ग केला जातो.
२) एकूण निव्वळ नफ्याचा २५ टक्के भाग वाटप व्यवहार गंगाजळीमध्ये जमा केला जातो.
३) एकूण निव्वळ नफ्याचा ३५ टक्के भाग विशेष विकास निधी-मध्ये जमा केला जातो.

३) भांडी विभाग :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८२-८३ या वर्षामध्ये भांडी विभाग सुरु केला. या भांडी विभागामार्फत लोकांना विवाह, व इतर धार्मिक कार्यक्रमाच्यावेळी आवश्यक असणारी भांडी योग्य ते भाडे घेऊन उपलब्ध करुन दिली जातात. त्यामुळे लोकांची गैरसोय दूर होण्यास मदत झाली. या विभागामार्फत प्रामुख्याने ताटे, वाटया, फुलपात्र, लहान-मोठी पातेली, बादल्या, जग, छूटया, ओगराळे, दांडाभांडे, ग्लास, उलातणे इ. भांडी भाडयाने दिली जातात.

१९८२-८३ ते १९९०-९१ या नऊ वर्षामध्ये संस्थेच्या भांडी विभागाच्या व्यवहारातील वाढ तक्ता क्र. ५.४ मध्ये दर्शविली आहे. संस्थेने या नऊ वर्षामध्ये रु. १९,५३६-५५ ची भांडी खरेदी केलेली आहेत. १९८२-८३ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेला एकूण रु. ४६,२३०-०५ इतके भांडी भाडे मिळाले आहे व १९८२-८३ ते १९९०-९१ या काळामध्ये रु. १६,०६८-२३ इतका झिज निधी व रु. ८,६७४-७४ इतके भांडवली व्याज दिलेले आहे. भांडी विभागास १९८२-८३ ते १९९०-९१ या काळामध्ये

तक्ता क्र. ५.४

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या माडी विभागाकडील व्यवहारातील वाढ

| वर्ष | माडी खरेदी (रुपयात) | माडी भाडे जमा (रुपयात) | झीज निधी (रुपयात) | भांडवल व्याज (रुपयात) | निव्वळ नफा (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | - | - | - | - | - |
| १९८१-८२ | - | - | - | - | - |
| १९८२-८३ | १२,५३९-९५ (१००.००) | ४,०९६-९५ (१००.००) | ६९९-०० (१००.००) | - | ३,३९७-९५ (१००.००) |
| १९८३-८४ | - | ४,५०६-५० (१२.११) | ६९९-०० (०.००) | - | ३,८०७-५० (१४.७५) |
| १९८४-८५ | ६,९२४-६० (१००.००) | ४,५२०-६० (०.३१) | ६९९-०० (०.००) | ८००.०० (१००.००) | ३,०२१-६० (-२०.६४) |
| १९८५-८६ | - | ३,३९८-२५ (-२४.८३) | ६९९-०० (०.००) | ८००-०० (०.००) | १,८९९-२५ (-३७.१४) |
| १९८६-८७ | ७२-०० (१००.००) | ३,८९१-२५ (१४.५१) | ९७६-८५ (३९.७५) | १,७६०-७० (१२०.०८) | १,१५३-६० (-३९.२६) |
| १९८७-८८ | - | ४,६०६-७५ (१८.३९) | ९७६-८३ (०.००) | १,७५०-९२ (-०.५६) | १,८४१-०० (५९.५९) |
| १९८८-८९ | - | ७,८८४-४० (७१.१५) | ९७६-८५ (०.००) | १,५५१-१२ (-११.४१) | ५,३५६-४३ (१९०.९५) |
| १९८९-९० | - | ८,०९८-९५ (१.७०) | ९७६-८५ (०.००) | ९९४-०० (-३५.९२) | ६,०४८-१० (१२.९१) |
| १९९०-९१ | - | ५,३८६-४० (-४८.८७) | ९७६-८५ (०.००) | १,०९८-०० (२.४१) | ३,३५१-५५ (-४४.५८) |
| एकूण : | १९,५३६-५५ | ४६,२३०-०५ | १६,०६८-२३ | ८,६७४-७४ | २९,७९६-९८ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

(टीप : कंसातील आकडे संबंधित घटकाचे वार्षिक वृध्दीदर दर्शवितात)

# आलेख क्र. ५.३

## "१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या भांडी विभागाचा निव्वळ नफा दर्शविणारा आलेख"

**प्रमाण :-**

१ सें.मी. = १००० रु निव्वळ नफा.



रु. २९,७९६-९८ इतका निव्वळ नफा झालेला आहे. १९८२-८३ ते १९९०-९१ या काळातील निव्वळ नफ्याच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ उतार झालेला आहे. भांडी विभागास होणारा नफा संस्थेच्या नफ्यामध्ये वर्ग केला जातो.

४) गुळ आवक स्पर्धा :

कदमवाडी विविध कार्यकारी (विकास) सहकारी सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने दिलेल्या कर्जाची जास्तीत जास्त वसुली व्हावी व सभासदांमध्ये शेतमालाचे (गुळ) उत्पादन वाढविण्याची व उत्पादित मालाची संस्थेमार्फत व सहकारी यंत्रणे मार्फत जास्तीत जास्त विक्री करण्याची ईर्षा व जिद्द निर्माण होण्याच्या दृष्टीने गुळ आवक स्पर्धा हा उपक्रम १९७७-७८ या वर्षी चालू केलेला आहे. गुळ आवक स्पर्धेमध्ये तीन नंबर काढले जातात व त्यांना संस्थेमार्फत बक्षीस दिले जाते. जो सभासद संस्थेमार्फत, सहकारी यंत्रणे-मार्फत जास्तीत जास्त गुळ विक्री करेल त्यांना ही बक्षिसे दिली जातात. पहिल्या क्रमांकाचे बक्षीस रु. ५१-०० व फेटा किंवा साडी, दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस रु. ३१-०० व फेटा किंवा साडी आणि तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस रु. २१-०० व फेटा किंवा साडी असे आहे.

१९८६-८७ पर्यन्तच ही स्पर्धा आयोजित केली गेली. १९८७-८८ मध्ये संस्थेने ही स्पर्धा बंद केलेली आहे.कारण या स्पर्धेमध्ये सभासदांच्या कडून गैर प्रकार होऊन संस्थेची फसवणूक होऊ लागली. त्यामुळे संस्थेने ही स्पर्धा बंद करण्याचा निर्णय घेतला.

१९८०-८१ ते १९८६-८७ या काळातील या स्पर्धेचे विजयी सभासद तक्ता क्र. ५.५ मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता क्र. ५.५

गूळ आवक स्पर्धेचे मानकरी

| वर्ष | गूळ आवक स्पर्धेच्या मानकरी सभासदाचे नाव | दर स्करी संस्थेमार्फत सहकारी यंत्रणेद्वारा गूळ गाडीची विक्री | बक्षीस |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | १) श्री. हिंदुराव गणपत पाटील | ६ गाडी १२ रवे | रु. ५१-०० |
| | २) श्री. दत्तात्रय शंकर पाटील | ४ गाडी ११ रवे | रु. ३१-०० |
| | ३) श्री. सदाशिव तुकाराम सैकपाळ | ४ गाडी ३ रवे | रु. २१-०० |
| १९८१-८२ | १) श्री. सदाशिव तुकाराम सैकपाळ | ४ गाडी १३ रवे | रु. ५१-०० |
| | २) श्री. दत्तात्रय शंकर पाटील | ४ गाडी १ रवा | रु. ३१-०० |
| | ३) श्री. गोपाळ रामचंद्र सावंत | ३ गाडी २१ रवे | रु. २१-०० |
| १९८२-८३ | १) श्री. महादेव बळवंत सावंत | ६ गाडया ११ रवे | रु. ५१-०० व फेटा |
| | २) श्री. वसंतराव दत्तोबा जाधव | ५ गाडया १६ रवे | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) श्री. शंकरराव विठ्ठल देशमुख | ५ गाडया १० रवे | रु. २१-०० व फेटा |
| १९८३-८४ | १) श्री. दत्तात्रय शंकर पाटील | ४ गाडया १८ रवे | रु. ५१-०० व फेटा |
| | २) श्रीमती निर्मला आनंदराव कदम | ४ गाडया १ रवा | रु. ३१-०० व साडी |
| | ३) श्री. बाबूराव शंकर पाटील | ४ गाडया | रु. २१-०० व फेटा |
| १९८४-८५ | १) श्री. प्रकाश बजरंग मेढे | ८ गाडया २३ रवे | रु. ५१-०० व फेटा |
| | २) श्री. मोहन मल्हारी कदम | ६ गाडया २० रवे | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) श्री. चंद्रकांत मानसिंग कदम | ५ गाडया २२ रवे | रु. २१-०० व फेटा |
| १९८५-८६ | १) भागिरथी रानजी पाटील | ६ गाडी २१ रवे | रु. ५१-०० व साडी |
| | २) श्री. विष्णू गोविंद खरे | ६ गाडी ९ रवे | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) निर्मला आनंदराव कदम | २ गाडी १७ रवे | रु. २१-०० व साडी |
| १९८६-८७ | १) श्री. जयवंत सिताराम कदम | ४ गाडी १९ रवे | रु. ५१-०० |
| | २) निर्मला आनंदराव कदम | ३ गाडी १ रवा | रु. ३१-०० |
| | ३) श्री. विष्णू गोविंद खरे | ४ गाडी १८ रवे | रु. २१-०० |

टीप : १) १ गाडी गूळ = ७ क्वि. गूळ

२) १ रवा गूळ = ३० किलो गूळ

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

५) ऊस टनेज उत्पादन स्पर्धा :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने सभासद शेतक-यांमध्ये ऊस उत्पादन वाढविण्याची व उत्पादित ऊस संस्थेमार्फत, सहकारी यंत्रणेमार्फत विक्री करण्याची ईर्षा व जिद्द निर्माण होण्यासाठी व संस्थेची कर्ज वसूली जास्तीत जास्त व्हावी म्हणून ऊस टनेज उत्पादन स्पर्धा १९८३-८४ मध्ये सुरु केली. या स्पर्धेमध्ये तीन नंबर काढले जातात व त्यांना संस्थेमार्फत बक्षीस दिले जाते. जो सभासद जास्तीत जास्त दर एकरी ऊस उत्पादन करुन, संस्थेमार्फत, सहकारी यंत्रणेमार्फत विक्री करेल त्यांना ही बक्षीसे दिली जातात. पहिल्या क्रमांकासाठी रु. ५१-०० व फेटा बक्षीस, दुस-या क्रमांकासाठी रु. ३१-०० व फेटा बक्षीस व तिस-या क्रमांकासाठी रु. २१-०० व फेटा बक्षीस दिले जाते.

ही स्पर्धा संस्थेने १९८६-८७ पर्यन्तच चालू ठेवली. १९८७-८८ मध्ये ही स्पर्धा संस्थेने बंद केली. कारण या स्पर्धेमध्ये सभासदांच्याकडून गैरप्रकार होऊन संस्थेची फसवणूक केली जाऊ लागली. त्यामुळे संस्थेने ही स्पर्धा बंद केलेली आहे.

१९८३-८४ ते १९८६-८७ या काळातील ऊस टनेज उत्पादन स्पर्धेचे विजयी सभासद तक्ता क्र. ५.६ मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता क्र. ५.६

ऊस टनेज उत्पादन स्पर्धेची माहिती

| वर्ष | सभासदाचे नाव | दर एकरी टनेज उत्पादन | बक्षीस |
|---|---|---|---|
| १९८३-८४ | १) अ) श्री. हिंदुराव गणपत पाटील | ३५ टन २ क्विंटल | रु. ५१-०० व फेटा विभागून |
| | ब) श्री. नारायण गणपत पाटील | ३५ टन २ क्विंटल | |
| | २) श्री. रामचंद्र लक्ष्मण शहापूरे | ३० टन | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) श्री. रंगराव गणपत शिंदे | २६ टन ९ क्विंटल | रु. २१-०० व फेटा |
| १९८४-८५ | १) श्री. आनंदराव गणपत पाटील | ८० टन | रु. ५१-०० व फेटा |
| | २) श्री. पांडुरंग येसू पाटील | ४२ टन | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) श्री. पांडुरंग हरी मेढे | ३२ टन | रु. २१-०० व फेटा |
| १९८५-८६ | १) आक्काताई जोती तोरस्कर | ४२ टन | रु. ५१-०० व साडी |
| | २) श्री. शंकर लक्ष्मण शहापूरे | ४१ टन | रु. ३१-०० व फेटा |
| | ३) श्री. अशोक राजाराम माने | ३६ टन | रु. २१-०० व फेटा |
| १९८६-८७ | १) श्री. पांडुरंग हरी मेढे | ५९ टन ९१० कि. | रु. ५१ -०० |
| | २) आक्काताई जोती तोरस्कर | ५८ टन ९१५ कि. | रु. ३१-०० |
| | ३) श्री. बाळासो रामचंद्र साळोखे | ५८ टन ६७७ कि. | रु. २१-०० |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.